# एपीवाय नागरिक सनद

**या बँक-शाखेद्वारे सेवा देण्याप्रती कटिबद्धता**

**I. नवीन एपीवाय खाते उघडणे**

- १८ ते ४० वर्षे वयोगटातील सर्व संभाव्य एपीवाय ग्राहकांना एपीवायचे लाभ व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
- नोंदणीसाठी संभाव्य एपीवाय ग्राहकांना एपीवाय सबस्क्रायबर रजिस्ट्रेशन फॉर्म प्रदान करणे.
- एपीवाय खाते उघडतेवेळी ग्राहकांना पोचपावती व ग्राहक माहिती पुस्तिका प्रदान करणे.
- एपीवाय खाते उघडल्यानंतर ई-प्रान कार्ड प्रदान करणे.
- विद्यमान ग्राहकांच्या कुटुंबातील पात्र सदस्यांना (पती/पत्नी व मुले) एपीवायचे लाभ व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे आणि त्यांना एपीवाय खाते उघडण्यासाठी सुविधा देणे.
- ग्राहकांना त्यांच्या बचत बँक खात्यामध्ये ऑटो-कर्जाच्या निवडलेल्या वारंवारतेनुसार योगदान रकमेशी समानुपाती पुरेसी शिल्लक रक्कम ठेवण्यासंदर्भात माहिती देणे.

**II. संचय टप्प्यांतर्गत सेवा**

- एपीवाय ग्राहकाने विनंती केल्यास खात्यांचे स्टेटमेंट प्रदान करणे.
- खालील बदल करण्यासंदर्भात एपीवाय सबस्क्रायबर मोडिफिकेशन फॉर्म प्रदान करणे:
    - I. नॉमिनी/ पती किंवा पत्नीच्या माहितीमध्ये बदल/सुधारणा.
    - II. वारंवारतेमध्ये बदल/सुधारणा.
    - III. जन्मतारीखेमध्ये बदल/सुधारणा.
    - IV. पेन्शन रक्कम वाढवणे/कमी करणे.
    - V. बँक/एपीवाय सेवा प्रदात्यामध्ये बदल.
- एपीवाय खात्यामधील बँक खात्याची सध्याची माहिती अपडेट करणे.
- पेन्शन रक्कमेच्या अपग्रेडेशनसंदर्भात थकीत एकरकमी रक्कमेचे गणन करण्यासाठी आणि डाऊन-ग्रेडेशनसंदर्भात बचत खात्यांमध्ये जमा होणा-या अंदाजित रक्कमेचे गणन करण्यासाठी मदत करणे.
- एपीवाय ग्राहकांना एपीवाय खात्यामध्ये सातत्यता राखण्याचे महत्त्व स्पष्ट करणे आणि अनियमित एपीवाय खाते व्यवहारासंदर्भात थकीत रक्कम व विलंब शुल्काचे गणन करण्यामध्ये मदत करणे.
- नियमांमध्ये नमूद केल्यानुसार निर्धारित वेळेत ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करणे.

**III. एपीवाय अंतर्गत निकास**

- एपीवायअंतर्गत स्वैच्छिक निकास करण्यासाठी फॉर्म प्रदान करणे.
- विद्यमान एपीवाय ग्राहकाचा मृत्यू झाल्यास पती / पत्नीला खाते सुरू ठेवण्यासंदर्भात किंवा बंद करण्यासंदर्भात (मृत्यू प्रकरणामध्ये) फॉर्म प्रदान करणे.
- एपीवाय ग्राहकाला एपीवाय निधी बचत बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर ते खाते बंद करण्यास सांगणे.

**IV. एनपीएस स्वावलंबन आणि एपीवाय**

- १८ ते ४० वर्षे वयोगटामध्ये पात्र असलेल्या विद्यमान एनपीएस लाइट-स्वावलंबन ग्राहकांना अटल पेन्शन योजनेमध्ये नोंदणी करण्यासंदर्भात माहिती देणे.
- पात्र ग्राहकांकडून मिळालेल्या नोंदणीसंदर्भातील विनंतीची प्रक्रिया करणे आणि एनपीएस लाइट-स्वावलंबनमधून एपीवायमध्ये यशस्वीरित्या नोंदणी झाल्यानंतर एनपीएस लाइट-स्वावलंबनची थकबाकी रक्कम एपीवाय खात्यामध्ये येत असल्याची खात्री घेणे.

**V. एपीवाय अ‍ॅप, डाऊनलोड करण्याची पद्धत आणि लाभांबाबत माहिती**

- एनएसडीएलच्या एपीवाय अ‍ॅपची वैशिष्ट्ये व लाभ, तसेच हे अ‍ॅप प्ले स्टोअरवर उपलब्ध असण्यासंदर्भात माहिती सांगणे.

**VI. संपर्क माहिती**

- **एपीवायसंदर्भात तक्रार करण्यासाठी: www.npscra.nsdl.co.in>>Home>>select: एनपीएस लाइट**
- **पीएफआरडीएचे एपीवाय हेल्प डेस्क: 1800 110 069**
- **पीएफआरडीए वेबसाइट: www.pfrda.org.in**